स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र विद्याशाखा अतर्गत समाजशास्त्र विषयाच्या पिएच.डी. पदविसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा.

SYNOPSIS

बेरड जमात : एक समाजशास्त्रीय अभ्यास
(विशेष संदर्भ : कोल्हापूर जिल्हा)

♦ **संशोधक** ♦

प्रा. काळे दिलीप सदाशिव

समाजशास्त्र विभाग
राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, महागाव,
ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

♦ **मार्गदर्शक** ♦

प्रा. डॉ. कांबळे बी.एम.

संशोधन मार्गदर्शक तथा सहयोगी प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग प्रमुख
यशवंत महाविद्यालय नांदेड,

जानेवारी - २०१८

बेरड जमात : एक समाजशास्त्रीय अभ्यास

(विशेष संदर्भ : कोल्हापूर जिल्हा)

"A sociological Study of BERAD Tribe "

Special Reference : Kolhapur District

प्रस्तावना (Introduction):

खंडप्राय भारतीय समाजात अनेक धर्म, पंथ, भाषा, जातीय समुदाय, संस्कृती या सर्वच बाबतीत कमालीची विविधता आढळून येते. भारतीय समाजात प्राचीन काळापासून अनेक विविध जाती, उपजाती, सांस्कृतिकदृष्टया वेगवेगळया दिसून येतात. काही जाती समुदायाचा विकास झाला तर काही विकासाच्या मार्गावर आहेत. काही अद्यापही विकासापासून वंचीत असलेले दिसून येते. आजच्या शैक्षणिक, आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रामध्ये बेरड समुदायाचे स्थान काय आहे याचा आढावा घेणे गरजेचे आहे. ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचे प्रमाण, रोजगार, व्यवसाय, बेरोजगारी तरुण मुलांचे महिलांचे समाजाप्रती आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीकोणातून हा समुदाय सक्षम आहे का? किंवा त्याची प्रगती होण्यासाठी कोणत्या बाबींची आवश्यकता आहे हे संशोधनाच्या माध्यमातून स्पष्ट करता येईल.

प्राचीन भारतीय समाजाचा विचार केला तर प्रामुख्याने बेरड जमात हा अलीप्त जीवन जगत होता तर मध्ययुगीन कालखंडामध्ये राजेशाही व्यवस्थेमध्ये किल्याच्या बाहेरच्या बाजूला वसाहत करुन राहणे, किल्याचे रक्षण करणेची जबाबदारी प्रामुख्याने बेरड, रामोशी जमातीवर असलेली दिसून येते. महाराष्ट्रातील प्रमुख सेनापती किंवा किल्लेदार म्हणून उमाजी नाईक, बहिर्जी नाईक, सेनापती प्रतापराव गुजर यासारखे लढवये सरदार दिसून येतात. महाराष्ट्रातील सीमा भागामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, पश्चिम महाराष्ट्रामध्ये बेरड जमातीची संख्या काही भागामध्ये प्रामुख्याने आढळून येते. या व्यतिरिक्त बेरड समुदायांच्या वसाहती अतिशय अल्प प्रमाणात दिसून येतात. महाराष्ट्रातील मागास जाती जमातीपैकी **रामोशी, नाईक, गुजर, वंजारी, बंजारी, धनगर** इत्यादी जाती जमातीपैकी बेरड समुदाय १९६१ च्या महाराष्ट्र शासनाच्या जनगणने नुसार VJ-1 जमात आहे.

आजच्या काळातील सद्य:स्थिती सामाजिक क्षेत्रामध्ये या जमातीचे योगदान, राजकीय व्यवस्थेतील स्थान, आर्थिक स्थिती काय आहे, बदलत्या काळानुसार या जमातीच्या गरजा त्यांच्या अपेक्षा काय आहेत यांची जाणीव करुन घेण्याच्या दृष्टीने बेरड समुदाय समाजशास्त्रीय अभ्यास संशोधनाचा विषय निवडला आहे.

सदरील संशोधन विषयामध्ये बेरड जमातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवन पद्धतीचा आढावा, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय स्थितीचा अभ्यास केला जाणार आहे. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये राजकीय विविध सेवा, सवलती किती प्रमाणात मिळाल्या, त्याचा फायदा/लाभ किती व्यक्तीला झाला. शासकीय सवलतीची आवश्यकता आहे का? या संदर्भात या संशोधनामध्ये आढावा घेणेचा मी प्रयत्न करेन. वरील अभ्यासावरुन जे काही निष्कर्ष निघतील ते सर्व संशोधन पद्धतीने मांडले जातील.

१) संशोधन पद्धती (Research Method) :

सर्व सामाजिक शास्त्रामध्ये संशोधन करीत असताना सामाजिक संशोधन पद्धती अतिशय महत्त्वाची असते. शास्त्रीय संशोधन पद्धतीमुळे समस्याची उकल क्रमबद्ध पद्धतीने अभ्यास केल्यामुळे वेगवेगळी तथ्य संकलीत करता येतात व नवीन तथ्याचा शोध घेऊन संशोधनाचा हेतू साध्य करता येतो. याच दृष्टीकोणातून "बेरड जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास" या विषयाचे अध्ययन करुन नवीन तथ्याच्या आधारे विश्लेषण केले जाईल.

२) संशोधन समस्याची निश्चिती (Formulation of Problem):

विषयाची निवड करणे किंवा एखादी समस्या निश्चित करुन त्याचा अभ्यास करणे ही संशोधनातील पहिली पायरी असून त्या संदर्भातील विषयाचा विशिष्ट दर्जा किवा भूमिका काय आहे. सद्य स्थितीचा विचार करता "बेरड जमातीचा : एक समाजशास्त्रीय अभ्यास" हा अभ्यास विषय मी मार्गदर्शकाशी चर्चा करुन निवडला आहे. या विषयाचे सविस्तर अध्ययन प्रस्तूत प्रबंधात केले जाणार आहे.

३) संशोधन विषयाचे महत्त्व (Important Research Subject):

भारतीय स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये विविध जाती समुदायाची झालेली प्रगती किंवा एखादया जाती समुहाचा विकासाच्या घटकापासून असलेला दुरावा किंवा प्रगत समाजाच्या तुलनेमध्ये असलेले सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण जाणून घेण्याच्या दृष्टीकोणातून सदरील संशोधन महत्त्वाचे आहे. वरील संशोधनामध्ये बेरड जमातीतील काही महत्वाच्या पैलूवर प्रकाश टाकता येईल.

- बेरड जमातीतील सामाजिक जीवनमान सुधारणेस मदत होईल.
- सामाजिक, आर्थिक विकासासाठी मार्गदर्शक ठरेल.
- राजकीय, शैक्षणिक दृष्टीकोणातून मार्गदर्शन मिळेल.
- सामाजिक जीवनमानाच्या दृष्टीकोणातून जीवनमान उंचावणेस मदत होईल.
- बेरड जमातीतील नागरीकांचे सामाजिक जीवन सुधारणेस मार्गदर्शक ठरेल.

४) संशोधनाचे उद्देश :

- बेरड जमातीच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करणे.
- बेरड जमातीच्या राजकीय, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.
- बेरड जमातीच्या व्यक्तीचे कौटुंबीक जीवनाचा अभ्यास करणे.
- बेरड जमातीच्या शासकीय ध्येय, धोरणांचा आढावा घेणे.
- बेरड जमातीच्या सर्वांगीन विकासाच्या दृष्टीकोणातून शास्त्रीय पद्धतीने माहिती संकलीत करुन माहितीचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढणे.

५) संशोधनाची ग्रहीतकृत्ये (Hypothesis) :

- बेरड जमातीतील पुरुषप्रधान समाज व्यवस्थेतील महिलांची स्थिती.
- बेरड जमातीतील कौटुंबीक जीवनाचा आढावा घेण्यात येईल.

- बेरड जमातीतील आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यात येईल.
- बेरड जमातीतील शैक्षणिक, राजकीय स्थितीचा आढावा घेण्यात येईल.
- बेरड जमातीतील वैवाहिक स्थितीचा आढावा घेण्यात येईल.
- बेरड जमातीतील शासकीय योजनांची माहिती अभ्यासणे.

६) संशोधन आराखडा (Research Design):

प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग करण्यात येणार आहे.

७) नमुना निवड पद्धत (Sampling Method):

प्रस्तूत संशोधन कार्यामध्ये कोल्हापूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्याला न्याय देण्याच्या दृष्टीकोणातून प्रत्येक तालुक्यातील २० कुटूंबप्रमाणे एकूण ११ तालुक्यातून २२० कुटूंबाचा अभ्यास करणेचा माझा मानस आहे. प्रस्तूत संशोधनात नमुन्याची निवड गैर संभाव्य नमुना निवड प्रकारातील सहेतूक नमुना निवड पद्धतीने केला जाईल. अध्ययन क्षेत्र जरी मर्यादित असले तरी अभ्यास हा सर्वसमावेशक स्वरुपाचा असेल याची मला खात्री आहे.

८) तथ्य संकलन (Data Collection) :

प्रस्तूत अध्ययनाकरिता आपल्या सोईनुसार सर्व साधारण प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाचा वापर केला जाईल. या अध्ययनात प्राथमिक तथ्य म्हणून मुलाखत अनुसूचिचा वापर केला जाणार आहे. तर दुय्यम स्तोत्र म्हणून प्रकाशीत दस्तऐवज संदर्भग्रंथ, मासिके, विविध अहवाल, आकडेवारी, वृत्तपत्र इ. याचा वापर करणार आहे.

९) तथ्याचे विश्लेषण (Data Analysis):

प्रस्तूत संशोधनामध्ये संकलीत केलेल्या तथ्याच्या आधारे तथ्याचे विश्लेषण केले जाणार आहे.

१०) संशोधन व्यक्ती व मर्यादा :

प्रस्तूत अभ्यास हा संपूर्ण कोल्हापूर जिल्हयातील तालुक्यातून करावयाचा आहे. तालुक्यातील प्रत्येक गावात बेरड जमात अस्तीत्वात असेलच असे नाही. या अध्ययनात ग्रामीण व शहरी भागातील कुटूंबाचा अभ्यास केला जाणार आहे. माझ्या संशोधन विषयाला अनुरुप मी कोल्हापूर जिल्हयातील कोल्हापूर, करवीर, हातकणंगले, शिरोळ, पन्हाळा, शाहूवाडी, गगनबावडा, कागल, आजरा, गडहिंग्लज, चंदगड असे ११ तालुक्यातून प्रत्येकी २० प्रमाणे ग्रामीण आणि शहरी कुटूंबाचा अभ्यास करणार आहे.

११) सारणीकरण (Tabulation):

प्रस्तूत संशोधन अध्ययनातील निष्कर्ष हे तथ्यसंकलानातील वर्गीकरण तथ्याचे गटातील एककाची मोजणी व विश्लेषण करुन करण्यात येणार आहे. या बरोबर कोष्टकातील माहितीचे वर्गीकरण विश्लेषण करताना गुणाकार, बेरीज, भागाकार इ. सांकेतीक घटाकाचा वापर केला जाणार आहे.

१२) अहवाल लेखन (Research Report):

प्रस्तूत संशोधन प्रबंधाचे अहवाल लेखन करताना तीन विभागात विभागले जाणार आहे. पहिल्या विभागात संशोधनाच्या औपचारिक घटाकांचा समावेश केला जाणार आहे. यात मुख्यपृष्ठ, अनुक्रमणिका, ऋणनिर्देश इ. तर दुसऱ्या विभागात प्रकरणाची मांडणी येणार आहे तिसऱ्या विभागात परिशिष्टे जोडली जाणार आहेत. त्या तथ्य संकलनासाठी मुलाखत, अनुसूची, छायाचित्र तसेच संशोधन विषयाच्या अनुषंगाने उपयोगात येणाऱ्या संज्ञाचे अध्ययन केले जाणार आहे ते पुढील प्रमाणे.

प्रकरणाचा तपशील :

१) प्रस्तावना

२) संशोधन पद्धती

३) बेरड जमातीची कौटुंबिक व वैवाहिक स्थिती

४) बेरड जमातीतील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक स्थिती

५) बेरड जमातीतील आर्थिक, राजकीय, शैक्षणिक स्थिती

६) महाराष्ट्र शासन बेरड जमातीसाठी विविध योजनांची माहिती

७) निष्कर्ष व शिफारशी

१३) संदर्भग्रंथ :

१) बेरड - डॉ. भिमराव गस्ती

२) माझे स्वप्न साकार झाले - शिवाजीराव पाटोळे

३) गुन्हेगारी जाती - त्रि. ना. आत्रे

४) विमुक्तायन - लक्ष्मण माने

५) फास उमाजी नाईकांचा - प्रा. बाबासाहेब जाधव

६) जातीव जमाती - रामनाथ चव्हाण

७) रामोशी समाज एक क्रांतीज्योत - वसंत चव्हाण

८) बंद दरवाजा - लक्ष्मण माने

९) महाराष्ट्रातील भटका समाज व संस्कृती - डॉ. ना. धो. महानोर

संशोधक
प्रा. काळे दिलीप सदाशिव
राजा शिवछत्रपती महाविद्यालय, महागांव
ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

मार्गदर्शक
प्रा. डॉ. कांबळे बी.एम.
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख
यशवंत महाविद्यालय, नांदेड